# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.03.2025** **वार:शनिवार**

1. इलेक्ट्रॉनिक्स उपकरण उत्पादन योजनेला केंद्र सरकारची मंजुरी, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ
2. पंतप्रधानांचा उद्या नागपूर दौरा
3. राज्यातल्या 64 लाख शेतकऱ्यांच्या खात्यांवर एकंदर 2 हजार 555 कोटी रुपयांची विमा नुकसान भरपाई जमा होणार
4. साखर कारखान्यांनी ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आवाहन आणि
5. पुण्यात येत्या 13 ते 24 एप्रिल दरम्यान फिडे महिला ग्रां-प्री बुद्धीबळ स्पर्धेच्या पाचव्या टप्प्याचं आयोजन

**<u>केंद्रिय मंत्रीमंडळ</u>**

देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनाला चालना देण्यासाठी तसंच इलेक्ट्रॉनिक्स पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारनं इलेक्ट्रॉनिक्स उपकरण उत्पादन योजनेला मंजूरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांना केंद्रीय मंत्रीमंडळाच्या निर्णयांबाबत माहिती दिली. गेल्या दहा वर्षात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचा वेगाने विकास झाला आहे. इलेक्ट्रॉनिक्सच्या निर्यातीतही या काळात एकंदर वार्षिक 20 टक्के वाढ झाल्याचं वैष्णव यावेळी म्हणाले. इलेक्ट्रॉनिक्स उपकरण उत्पादन योजनेसाठी 22 हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार असून यामुळे प्रत्यक्ष तसंच अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील असं वैष्णव यांनी सांगितलं. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना दोन टक्के महागाई भत्ता आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना दोन टक्के महागाई सवलत देण्याला काल मंत्रीमंडळानं अनुमती दिली. या वर्षाच्या एक जानेवारीपासून हा निर्णय लागू असेल. यंदाच्या खरीप हंगामासाठी फॉस्फेट आणि पोटॅश खतांसाठीच्या अनुदानालादेखील मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून, गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षानिमित्त होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाचं औचित्य साधत, ते रेशीमबागेतल्या स्मृती मंदिर इथं संस्थापक डॉ केशव बळिराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील.तसंच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हजारो अनुयायांसह 1956 मध्ये ज्या ठिकाणी बौद्ध धर्म स्वीकारला, त्या दीक्षाभूमीलाही ते भेट देऊन आदरांजली वाहणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या विस्तार केंद्राची पायाभरणी होणार असून, त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. गुरुजी माधवराव सदाशिवराव गोळवलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 2014 मध्ये या नेत्रालयाची स्थापना झाली. आगामी प्रकल्पात 250 खाटांचं रुग्णालय, 14 बाह्यरुग्ण विभाग आणि 14 ऑपरेशन थिएटर असतील. त्यानंतर पंतप्रधान नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड इथं युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचे उद्घाटन करतील.

**<u>नुकसान भरपाई</u>**

राज्यातील 64 लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य शासनानं घेतला असून, शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट 2 हजार 555 कोटी रुपयांची विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून 2 हजार 852 कोटी वितरित करण्यास मान्यता दिली आहे, अशी माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली. या निर्णयामुळे 2022 पासूनच्या मागील विविध हंगामांतील प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या

आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा होणार आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना विमा कंपन्यांना देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचंही कोकाटे यांनी सांगितलं.

**अजित पवार**

साखर कारखान्यांनी ऊस उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केलं. बारामती जवळ माळेगाव सहकारी साखर कारखाना परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण आणि शेतकरी मेळावा कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. पवार पुढं म्हणाले की, यावर्षी ऊस पीकासाठी एआय आधुनिक तंत्रज्ञान बारामती मधल्या कृषी विज्ञान केंद्रानं आणलं असून त्याचा ऊस उत्पादनवाढीसाठी तसंच पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी मोठा फायदा होणार आहे. त्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात 500 कोटी रुपयांची तरतूद केली असून एआय तंत्रज्ञान सोयाबीन, कापूस, फळबागा आदींसाठीही वापरण्यात येईल, असंही पवार म्हणाले. लवकरच पुण्यात ॲग्री हॅकेथॉन भरवण्यात येणार असून त्यामाध्यमातून राज्यातील युवा संशोधक, स्टार्टअप्स, कृषी तज्ज्ञ, शेतकऱ्यांना एकत्र आणून आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीसंबंधी समस्या सोडवण्याचा प्रयत्न राज्य शासन करणार आहे, अशी माहिती ही पवार यांनी यावेळी दिली.

**शेवगा निर्यात-नवी मुंबई**

महिला बचत गटानं उत्पादन घेतलेल्या शेवग्याच्या शेंगांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या हेतूने प्रायोगिक तत्त्वावरील दोन टनांची पहिली खेप काल नवी मुंबईतून दुबईसाठी रवाना करण्यात आली. याविषयी माहिती देताना अपेडाचे उप महाव्यवस्थापक नागपाल लोहकरे म्हणाले....

**महिलांनी उत्पादित केलेला शेतमाल असेल, वेगवेगळ्या पदार्थातील प्रक्रिया केलेले पदार्थ असतील यांना मार्केटिंग ची एक संधी उपलब्ध करून देणे हे महत्वाचे काम आहे, आणि त्याच माध्यमातून आज आपण सोलापूर जिल्ह्यातील पंढपूर तालुक्यातील 2 टन शेवगा हा दुबई इथं निर्यात करत आहोत. आणि हे निर्यात करत असताना अनेक बाजारभावा पेक्षा कमीतकमी 80 ते 90 टक्क्यांचा जादा बाजारभाव या महिलांना मिळालेला आहे.**

उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश सागर याबाबत म्हणाले....

**हे उमेद्च्या माध्यमातून जे काही महिला बचत गट स्वयंसहाय्यता गट जे ग्रामीण स्तरावरती तयार करण्यात आलेले किंवा शेतीवर अधारतीत उत्पादने आहेत तर त्यांना याचा लगेच कसा फायदा मिळवता येईल त्या माध्यमातून आज अपेडा आणि उमेद यातून हे राबवण्याचा प्रयत्न केला आहे.**

शेवगा उत्पादक शेतकरी शीतल सुरवसे आपल्या उत्पादनाची निर्यात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना म्हणाल्या......

**अडीचशे एकर आमची शेवगाच्या शेंगांची बाग आहे ,त्याच्या पासून आम्हाला पाल्याचा पण उपयोग होतो त्यापासून बिस्किटे पण तयार होतात, आमच्या शेवगाच्या शेंगांचा माल इतर बाहेरच्या देशात जातो याचा आम्हाला खूप अभिमान आहे, कारण त्या शेवगाच्या शेंगांपासून आम्हाला फायदा जास्त मिळतो इथ शेंगा विकण्यापेक्षा बाहेर देशात शेंगा विकल्याचा आम्हाला खूप आनंद आहे.**

**गिरीश महाजन त्र्यंबकेश्वर-नाशिक**

त्र्यंबकेश्वर इथं 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणारे साधू संत आणि भाविकांसाठी कुशावर्ताप्रमाणंच नवं कुंड उभारण्यात येईल, तिथल्या विविध घाटांचं विस्तारीकरण आणि स्वच्छता करण्यात येईल तसंच गोदावरी नदी वाहती राहण्यासाठी सर्व उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी काल त्र्यंबकेश्वर इथं दिली. सिंहस्थ

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, महाजन यांनी त्र्यंबकेश्वरला भेट देऊन विविध घाटांची आणि परिसराची पाहणी केली. त्यानंतर घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. कुंभमेळ्याच्या योग्य नियोजन आणि सुविधा निर्मितीसाठी आवश्यक असणारी जमीन संपादित केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. या बैठकीला प्रशासकीय अधिकारी, पोलिस अधिकारी तसंच विविध आखाड्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**निधी-सिंधुदुर्ग**

येत्या सोमवारी 31 मार्चला होणाऱ्या आर्थिक वर्षाच्या सांगतेच्या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने विविध जिल्ह्यांना दिलेला विकास निधी खर्च करण्यात, सिंधुदुर्ग जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. पुणे जिल्हा दुसरा तर सोलापूर जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे अशी माहिती, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी काल कणकवली इथं पत्रकार परिषदेत दिली. राज्याकडून गतवर्षी सिंधुदुर्ग जिल्ह्याला विकासासाठी अडीचशे कोटी रुपयांचा निधी मिळाला होता. यातला 98 टक्के निधी आत्तापर्यंत खर्च झाला आहे असं त्यांनी सांगितलं.

**बुद्धीबळ**

महाराष्ट्र बुद्धीबळ संघटनेनं पुण्यात येत्या 13 ते 24 एप्रिल दरम्यान फिडे महिला ग्रांप्री बुद्धीबळ स्पर्धेच्या पाचव्या टप्प्याचं आयोजन केलं आहे. प्रतिष्ठेच्या कँडीडेट स्पर्धेसाठी या स्पर्धेतून पात्र ठरण्याची संधी असल्यामुळे या स्पर्धेला अत्यंत महत्त्व असल्याचं संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर परिणय फुके यांनी सांगितलं. ग्रँड मास्टर कोनेरु हंपी, ग्रँड मास्टर हरिका द्रोणावल्ली आणि ग्रँड मास्टर वैशाली आर यांच्यासह चीन, रशिया, पोलंड, बल्गेरिया, मंगोलिया, जॉर्जिया देशांच्या बुद्धीबळपटू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. पुण्यातली आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख वाईल्ड कार्डद्वारे या स्पर्धेत खेळणार आहे.

**हवामान**

राज्यात काल सर्वांत जास्त कमाल तापमान ब्रम्हपुरी इथं 42 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. आज कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून विदर्भात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.